आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२६ एप्रिल २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- युवाशक्ती जेव्हा राष्ट्राच्या उभारणीमध्ये सहभागी होते, तेव्हाच राष्ट्राचा विकास वेगानं होतो, असं प्रधानमंत्र्यांचं रोजगार मेळाव्यात प्रतिपादन

- गेली तीन दशकं दहशतवादी गटांना सहाय्य केल्याची पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांची कबुली

- मध्य प्रदेशात बालाघाटमधे आज सुरक्षादलांशी झालेल्या चकमकीत चार माओवादी ठार

**आणि**

- पोप फ्रान्सिस यांच्यावर आज अंत्यसंस्कार, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राहणार उपस्थित

**<><><><><>**

युवाशक्ती जेव्हा राष्ट्राच्या उभारणीमध्ये सहभागी होते, तेव्हाच राष्ट्राचा विकास वेगानं होतो, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशातले तरुण आपल्या कठोर परिश्रम आणि नवनवीन उपक्रमांमधून राष्ट्र किती सक्षम आहे हे जगाला दाखवून देत आहेत, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. आज आयोजित रोजगार मेळाव्यात विविध सरकारी विभागांमध्ये नवनियुक्त ५१ हजारांहून अधिक तरुणांना दूरस्थ पद्धतीनं मोदी यांनी नियुक्ती पत्रं वाटली, त्यावेळी ते बोलत होते. अर्थसंकल्पात सरकारनं उत्पादन अभियानाची घोषणा केली असून त्याचं उद्दिष्ट ‘मेक इन इंडियाला प्रोत्साहन देणं, देशातल्या तरुणांना जागतिक दर्जाची उत्पादनं बनवण्याची संधी देणं हे असून यामुळे लाखो सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, लघु उद्योजकांना चालना मिळेल त्याचबरोबर देशभरात रोजगाराच्या नवीन संधीही खुल्या होतील, असं त्यांनी यावेळी सांगितलं. देशाच्या प्रगतीत महिलांचं योगदान अतिशय महत्त्वाचं असल्याचा पुनरुच्चारही प्रधानमंत्र्यांनी केला. ते म्हणाले,

**बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३४ सेंकद)**

मुंबईत येत्या १ ते ४ मे दरम्यान होणाऱ्या वेव्ह्ज २०२५ परिषदेचाही उल्लेख त्यांनी केला. या परिषदेमुळे डिजिटल कंटेंट क्षेत्राच्या भविष्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३४ सेंकद)**

१५ वा रोजगार मेळा आज देशभरातल्या ४७ ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. आज निवड आणि भरती झालेले कर्मचारी महसूल विभाग, कार्मिक आणि सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्ती वेतन मंत्रालय, गृह मंत्रालय, टपाल विभाग, उच्च शिक्षण विभाग, रेल्वे मंत्रालय, कामगार आणि रोजगार मंत्रालय यासारखी विविध मंत्रालयं आणि विभागांमध्ये सामील होणार आहेत. मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आणि दुसऱ्या कार्यक्रमात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी नियुक्ती पत्रांचं वाटप केलं. पुण्यात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्‌डा उपस्थित होते.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं जम्मू काश्मीरमधल्या पहलगाम हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. जागतिक शांततेसाठी दहशतवाद हा मोठा धोका असून सगळ्या प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्याची गरज आहे, असं परिषदेच्या सदस्यांनी म्हटलं आहे. पहलगाम हल्ल्याचे गुन्हेगार, समर्थक आणि प्रायोजक यांना शिक्षा देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

पाकिस्ताननं गेली तीन दशकं दहशतवादी गटांना सहाय्य केलं, अशी कबुली पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी दिली आहे. पाश्चिमात्त्य देशांच्या वतीनं हे घृणास्पद काम पाकिस्तान करत होता, असं त्यांनी एका ब्रिटिश

वाहिनीला मुलाखत देताना सांगितलं. मात्र ही मोठी चूक होती आणि या चुकीची शिक्षा पाकिस्ताननं भोगली आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानबरोबरचा सिंधु जल वाटप करार स्थगित करण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. या संदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्ली इथं एक उच्चस्तरीय बैठक घेतली. शहा यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतानं सिंधू जलवाटप करार स्थगित करण्याचा घेतलेला निर्णय हा पूर्णपणे न्यायसंगत असून राष्ट्रहिताला प्राधान्य देणारा आहे. पाण्याचा एकही थेंब पाकिस्तानात पोहोचणार नाही याची खबरदारी यापुढे घेतली जाईल, असं शहा यांनी या बैठकीत सांगितलं. भारतात सध्या वास्तव्याला असलेल्या पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून त्यांना तात्काळ परत पाठवण्यासाठी पावलं उचलण्याच्या सूचना शहा यांनी सर्व राज्यांना दिल्या होत्या. त्यानुसार काल नवी दिल्ली इथून १९१ पाकिस्तानी नागरिकांची मायदेशी रवानगी करण्यात आली.

**<><><><>**

उडान योजने अंतर्गत १ कोटी ४९ लाख प्रवाशांना परवडणाऱ्या दरात देशांतर्गत हवाई प्रवास उपलब्ध झाला आहे, असं हवाई वाहतूक मंत्रालयानं प्रसिद्ध केलं आहे. सध्या देशात ६२५ उडान मार्गांनी ९० विमानतळं जोडली आहेत. २०१४ मध्ये देशात ७४ विमानतळं होती, ही संख्या २०२४ मध्ये दुप्पटीपेक्षा जास्त होऊन १५९ विमानतळं इतकी झाली आहे.

**<><><><>**

मध्य प्रदेशमधे बालाघाट जिल्ह्यात आज पहाटे सुरक्षादलांशी झालेल्या चकमकीत चार महिला माओवादी ठार झाल्या. त्यांच्या डोक्यावर ६२ लाख रुपयांचं बक्षीस होतं. सध्या या भागात सुरू असलेल्या माओवादविरोधी मोहिमेअंतर्गत ही कारवाई झाल्याची माहिती बालाघाटचे पोलीस अधीक्षक नागेंद्र कुमार सिंह यांनी दिली.

<><><><><>

पोप फ्रान्सिस यांच्यावर आज आज रोम इथल्या 'बॅसिलिका ऑफ सेंट मेरी मेजर' इथं अंत्यसंस्कार होत आहे. जगभरातून विविध देशांचे प्रतिनिधी, तसंच कॅथलिक ख्रिश्चन बांधव पोप फ्रान्सिस यांना आदरांजली वाहण्यासाठी रोममध्ये जमले आहेत. भारताचं प्रतिनिधित्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू करणार आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ हेसुद्धा यावेळी उपस्थित असतील. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी देशात आज दुखवटा पाळला जात आहे. सर्व शासकीय इमारतींवरचा राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकत आहेत. रोमन कॅथलिक चर्चचं नेतृत्व करणारे पहिले लॅटिन अमेरिकन पोप, पोप फ्रान्सिस यांचं २१ एप्रिल रोजी वयाच्या ८८व्या वर्षी निधन झालं होतं.

<><><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेजवळ पाकिस्ताननं काल रात्री काश्मीर भागात शस्त्रसंधीचं अनेकदा उल्लंघन केलं. याला भारतीय सशस्त्र दलांनी चोख प्रत्युत्तर दिलं. या चकमकींमध्ये भारतात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तपास विविध यंत्रणा करत आहेत. संपूर्ण काश्मीर जिल्ह्यात शोधमोहिमा राबवल्या जात आहेत. राष्ट्रीय तपास यंत्रणेचं विशेष पथकही तपासकार्यात गुंतलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणी वर 'मन-की-बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. दर महिन्याच्या

शेवटच्या रविवारी सादर होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा १२१ वा भाग असेल. नागरिकांनी त्यांचे विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकाद्वारे पाठवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

'आकाशवाणी जनहित राखण्यासाठी तसंच माहिती-शिक्षण आणि मनोरंजन देण्यासाठी वचनबद्ध असून 'विश्वसनीयता' ही आकाशवाणीची ओळख आहे' असं आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर यांनी म्हटलं आहे. रेडिओ आणि श्राव्य कार्यक्रम निर्मिती क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या माध्यमांना काल रात्री मुंबईत झालेल्या एका समारंभात गौरवण्यात आलं त्या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून गौर बोलत होत्या. आकाशवाणीनं 'इंडिया ऑडिओ समीट अँड अवॉर्ड्स - २०२५' अंतर्गत विविध प्रकारात एकूण सहा पुरस्कार पटकावले आहेत. 'नई सोच नई कहानी- अ रेडियो जर्नी विथ स्मृति ईरानी' या माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या कार्यक्रमाला 'सीरीज़ ऑफ द ईयर' हा पुरस्कार मिळाला आहे. १३ भागांच्या या मालिकेमध्ये धैर्यवान महिलांच्या कहाण्या दाखवण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज संध्याकाळी कलकत्ता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स या संघांमध्ये कलकत्ता इथल्या इडन गार्डन मैदानावर सामना रंगणार आहे. चेन्नई इथं काल झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद या संघानं यजमान चेन्नई सुपर किंग्स संघाला ५ गडी राखून पराभूत केलं. चिदंबरम स्टेडिअमवर हा सामना पार पडला. सनराईजर्स हैदराबाद संघानं १८ षटक आणि चार चेंडूत १५५ धावांचं लक्ष गाठलं. ईशान किशनने ३४ चेंडूत ४४ धावा करत तर हर्षल पटेल ने ४ गडी बाद करत संघाच्या विजायमध्ये मोठा वाटा उचलला.

**//<><><><><>//**